*सर्वसामान्य माणसाच्या जीवनात निर्माण होणारा आनंद लोकप्रतिनिधीसाठी महत्वाचा – आ. सुधीर मुनगंटीवार*
*तुकूम परिसरात आयुष्यमान भारत योजनेच्या लाभार्थ्यांना, बांधकाम कामगारांना कार्डचे वितरण*
==============================================================

या जिल्हयाचा पालकमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळताना जनतेच्या हिताच्या अनेक योजना आम्ही जिल्हयात आणल्या. सर्व सामान्य जनतेच्या तक्रारींचे निराकरण सुलभ व्हावे यासाठी हॅलो चांदा ही पालकमंत्री तक्रार निवारण यंत्रणा जनतेच्या सेवेत रूजु केली. जिल्हयातील सुमारे 1200 दिव्यांग बांधवांना बॅटरी ऑपरेटेड ट्रायसिकल दिल्या. बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात सुमारे 35 हजार नागरिकांना चश्मे वितरीत केले, अनेक नेत्ररूग्णांना मोतिबिंदू शस्त्रक्रियेचा लाभ मिळवून दिला. जिल्हयात टाटा ट्रस्टच्या सहाय्याने कॅन्सर हॉस्पीटल मंजूर केले, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या कामाला गती दिली. चंद्रपूर-बल्लारपूर मार्गावर 122 एकर जागेवर देशातील उत्तम सैनिकी शाळेची निर्मीती करू शकलो याचा मला मनापासून आनंद आहे. सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आनंद निर्माण करणे हीच भगवतगीतेची शिकवण आहे, तो आनंद लोकप्रतिनिधीसाठी सर्वात मोठा असल्याचे प्रतिपादन माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

दिनांक 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमीत्त चंद्रपूर शहरातील तुकूम परिसरात भाजपा नगरसेवक सुभाष कासनगोट्टूवार यांच्या पुढाकाराने आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत कार्ड वितरण, बांधकाम कामगारांना कार्ड वितरण व रक्तदात्यांना प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आ. मुनगंटीवार बोलत होते. यावेळी मंचावर महापौर सौ. राखी कंचर्लावार, मनपा नगरसेवक सुभाष कासनगोटटूवार, उपमहापौर राहूल पावडे, नगरसेविका सौ. शिला चौहान, सौ. माया उईके, संजय कंचर्लावार, रवि आसवानी, सौ. छबू वैरागडे, पुष्पा उराडे, सौ मंजुश्री कासनगोटटूवार ,सौ. माया मांदाडे, नामदेव डाहूले, धर्माजी खंगार, श्री. टिपले आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. मुनगंटीवार पुढे म्हणाले, आपण आपल्या देशाला भारतमाता असे संबोधतो. भारतमाता ही माझी आई आहे ही भावना निर्माण होण्याची आवश्यकता आहे. कोणताही सेवाभावी प्रकल्प एकमेकांना मदत केल्याशिवाय पूर्ण होवू शकत नाही. सेवाभाव हा अतिशय महत्वाचा आहे. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या सेवाभावी वृततीतुनच आयुष्यमान भारत योजना व तत्सम अनेक योजनांचा लाभ देशातील गोरगरीब जनतेला मिळालेला आहे. अशा सेवाभावी योजनांचा लाभ गरजू, गरीब लाभार्थ्यांना मिळावा याद्दष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी प्रतिपादीत केली. या लोकाभिमुख उपक्रमाच्या आयोजनाबद्दल त्यांनी नगरसेवक सुभाष कासनगोट्टूवार यांचे अभिनंदन व कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष कासनगोट्टूवार यांनी केले. यावेळी बोलताना सुभाष कासनगोट्टूवार म्हणाले, जनकल्याणाला प्राधान्य देत विकासकामे करण्यावर सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी नेहमी भर दिला आहे. त्यांच्या प्रेरणेतुनच चंद्रपूर शहरात आम्ही लोकहिताची कामे व उपक्रम सातत्याने राबवित असतो. आयुष्यमान भारत योजना, बांधकाम कामगारांना साहित्य वितरण या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळावा यासाठी आम्ही उपक्रम राबविला. रक्तदानाच्या माध्यमातुन या श्रेष्ठदानाचा लाभ नागरिकांना मिळावा यासाठी उपक्रम राबविले. या उपक्रमांमागील आमची खरी प्रेरणा सुधीरभाऊच असल्याचे ते यावेळी बोलताना म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन नासिर खान यांनी केले तर आभार पुरूषोत्तम सहारे यांनी मानले. या कार्यक्रमाला तुकूम परिसरातील नागरिकांची मोठया संख्येन उपस्थिती होती.